# अल्पसंख्याक कल्याण समिती

## अल्पसंख्याक कल्याण समिती गठीत करण्यामागील पार्श्वभूमी व स्थापना

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा अहवाल विचारात घेण्यासाठी आणि यावर शासनाला कोणकोणत्या उपाययोजना सुचवावयास लागतील व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयामध्ये ज्याप्रमाणे अनुसूचित जाती कल्याण समितीच्या कार्यक्रमाचा, आर्थिक तरतुदीचा आढावा घेऊन उपाययोजना सुचविली जाते त्याप्रमाणे अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. यासंदभात दिनांक २५ ऑगस्ट, २००९ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंत्रीमंडळाने अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी "अल्पसंख्याक कल्याण समिती" स्थापन करण्यासाठी विधानमंडळ सचिवालयास शासनामार्फत विनंती करण्यास मान्यता उल्लेखित करुन यास्तव राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सदस्यांचा समावेश असलेली अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करण्याची विनंती करण्यात आली.

त्यानुसार विधानमंडळाने राज्यातील अल्पसंख्याकाच्या (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व *ज्यु) विकासासाठी राज्य शासन राबवित असलेल्या विविध कल्याणकारी योजनांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी व परिणामकारकरित्या संनियंत्रण करुन या समाजाचा सर्वांगिण विकास साधणे तसेच शासनाच्या विविध योजनांची संबंधित क्षेत्रिय स्तरावरील कार्यालयामार्फत प्रभावी अंमलबजावणी होऊन या समाज घटकातील लोकांना प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या योजनांचा लाभ झाला किंवा कसे याची तपासणी करणे, शासन राबवित असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीमध्ये कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या, निर्धारित उद्दिष्ट साध्य झाले किंवा कसे इत्यादी बाबींचा सर्वंकष आढावा घेऊन या विषयीची माहिती व अहवाल दोन्ही सभागृहांना सादर करण्याच्या दृष्टीने तसेच महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचा अहवाल विचारात घेऊन त्यावर शासनाला सुनियोजित अशी उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने "अल्पसंख्याक कल्याण समिती" या नावाची विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांची एक संयुक्त समिती दिनांक १४ डिसेंबर, २००९ रोजी गठीत करण्यात आली.

***( महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग चार-ब, दिनांक २ जुलै, २०१६ नुसार समाविष्ट करण्यात आले.)**

..२/-

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार—ब

वर्ष २, अंक ८६] शनिवार, जुलै २, २०१६/आषाढ ११, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

### असाधारण क्रमांक १८०

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश

अल्पसंख्याक विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ जुलै २०१६

### आदेश

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४.

क्रमांक विकाक. २०१५/प्र.क्र.१७७/का-९.—महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोग अधिनियम, २००४ ( २००५ चा महा. ३१) या कलम २ च्या खंड ( घ ) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासन, याद्वारे शासन आदेश, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक. २००५, ८९/प्र.क्र.१९/२००५/३५, दिनांक ९ ऑक्टोबर २००६ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त आदेशात, क्रमांक ६ च्या नोंदीनंतर खालील नोंद समाविष्ट करण्यात यावी:—

"(७) ज्यू.".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अनिस शेख,
शासनाचे अवर सचिव.

## MINORITIES DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, Dated the 2nd July 2016

## Order

MAHARASHTRA STATE MINORITIES COMMISSION ACT, 2004.

No. SAC. 2015/C.R.177/D-9.—In exercise of the powers conferred by clause (*d*) of Section [illegible]
of the Maharashtra State Minorities Commission Act, 2004 (Mah. XXXI of 2005), the Government
of Maharashtra hereby pleased to amend the Government Notification, General Administration
Department, Notification No. RAA. 2005/89/CR-19/2005/35 dated 9th October 2006 as follows,
namely :—

In the said notification, after 6 the following entry shall be added, namely :—

" (7) Jews ".

By order and in the name of the Governor of Maharashtra.

ANEES SHAIKH,
Under Secretary to Government.